राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत मंजुर उप संचालक, वित्त व लेखा (वेतनश्रेणी- एस-२३: ६७७००-२०८७००) हे पद एस-२९: १३११००-२१६६०० या वेतनश्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात श्रेणी उन्नत करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०२६/प्र.क्र.३२४/पासु-२
१० वा मजला,गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: १४ ऑगस्ट, २०२६

वाचा:-

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. अपदे-२०२६/प्र.क्र. ११६/पासु-२, दि.३०.०४.२०२६

प्रस्तावना:-

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान या कार्यक्रमासाठी निर्माण केलेल्या अतिरिक्त अभियान संचालक, सह संचालक, उपसंचालक (वित्त व लेखा) व सहायक संचालक (नागरी प्रकल्प) या ०४ अस्थायी पदांना दिनांक ०१.०३.२०२६ ते दिनांक ३१.०८.२०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच वित्त विभागाच्या आदेशान्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक संवर्गातील श्री. ल.मा. पाटील यांना बदलीने सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत मंजुर उप संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, मुंबई या पदावर नियुक्ती देण्यात आली. तथापि, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक हे पद एस-२९: १३११००-२१६६०० या वेतनश्रेणीतील असल्यामुळे श्री. ल. मा. पाटील यांचे वेतन व भत्ते अदा करण्यास अडचण निर्माण झाली होती. सदर बाब विचारात घेऊन राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत मंजुर उप संचालक, वित्त व लेखा (वेतनश्रेणी- एस-२३: ६७७००-२०८७००) हे पद एस-२९: १३११००-२१६६०० या वेतनश्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात श्रेणी उन्नत करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत मंजुर उप संचालक, वित्त व लेखा (वेतनश्रेणी- एस-२३: ६७७००-२०८७००) हे पद एस-२९: १३११००-२१६६०० या वेतनश्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात श्रेणी उन्नत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. एस-२९: १३११००-२१६६०० या वेतनश्रेणीत श्रेणी उन्नत केलेले उप संचालक, वित्त व लेखा (वेतनश्रेणी- एस-२३: ६७७००-२०८७००) हे पद महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील संचालक संवर्गातील श्री. ल. मा. पाटील (वेतनश्रेणी- एस-२९: १३११००-२१६६००) हे सदर पदावर कार्यरत असेपर्यंत अस्तित्वात राहील. त्यानंतर श्रेणी उन्नत केलेले पद आपोआप मुळ पदात रुपांतरीत होईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१४१४५३४७२९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAVITA PRADIP PISE

Digitally signed by KAVITA PRADIP PISE
DN: cn=KAVITA PRADIP PISE, o, ou, email=kavita.pise@nic.in, c=IN
Date: 2026.08.14 15:28:12 +05'30'

(क. प्र. पिसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई /नागपूर.
२) प्रधान सचिव-१, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
५) संचालक-१ व २, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई/ पुणे.
६) संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
७) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) मुंबई.
८) वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई
९) अवर सचिव / कार्यासन अधिकारी, (सेवा-१/सेवा-२/ अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती (कार्यासन पासु-२)